नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/१०/२०२५ ( रविवार )**

---

## ड्रोन कॅमेऱ्या द्वारे पेट्रोलींग करत जेसीबी च्या सहायाने दारूभट्टया आणि साहीत्य नष्ट करत अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३१ गुन्हे नोंद, १२ लाख ४७ हजार ५४० रूपयांचा मुद्देमाल जप्त नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

दिनांक १९/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात खालील नमुद विविध पोलीस स्टेशनच्या हद्दीत पोलीसांनी अवैध दारू काढणारे तसेच विक्रते यांच्यावर धडक कारवाई केली. जेसीबी च्या सहायाने कारवाई करत गावठी हातभट्टयां, मोहाफुल सडवा,मोहाफुल दारू आणि साहीत्य नष्ट करून गावठी हातभट्टीच्या दारूचे समुळ उच्चाटन करण्यात आले.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल प्रभार सावनेर यांच्या मार्गदर्शनात गौंडखैडी पारधी बेडा आणि राहुळगाव या ठिकाणी पोलीसांनी धाड टाकुन कारवाई करत ७ आरोपीतांवर ५ गुन्हे नोंद करून एकुण १,३८,८८० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.




**पोलीस स्टेशन बुटीबोरी**:— पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस, अधिकारी, नागपुर यांच्या मार्गदर्शनात असोला, पारधी बेडा या ठिकाणी पोलीसांनी धाड टाकुन कारवाई करत येथील ३ आरोपीतांवर १ गुन्हा नोंद करून एकुण ९८,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.



**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात डोंगरगाव, घुबडमेट आणि खानगाव या ठिकाणी पोलीसांनी धाड टाकुन कारवाई करत डोंगरगाव येथील ६ आरोपीतांवर ३ गुन्हे नोंद करून एकुण १,३६,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. घुबडमेट येथील २ आरोपीतांवर २ गुन्हे नोंद करून एकुण २२,२०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला तसेच खानगाव येथील ५ आरोपीतांतवर ४ गुन्हे करून एकुण १,०८,२०० /— रूपयांचा मुद्देमाल एकुण २,६६,९२०/— रूपयांचा मुद्दोमाल जप्त केला.




**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत सोनमोह या ठिकाणी पोलीसांनी धाड टाकुन कारवाई करत डोंगरगाव येथील ३ आरोपीतांवर ३ गुन्हे नोंद करून एकुण ४२,५०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.



**पोलीस स्टेशन रामटेक** :— पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनात पोलीसांनी नंदापुरी येथे धाड टाकुन कारवाई करत २ आरोपीतांवर १ गुन्हा  नोंद करून एकुण १,७१,११० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नगरधन येथील १ आरोपीवर १ गुन्हा नोंद करून एकुण १३,३८० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.एकुण १,८४,४९०/— रूपयांचा मुद्दोमाल जप्त केला.



**पोलीस स्टेशन देवलापार** :— देवलापार पोलीसांनी चोरबाहुल पारधी बेडा आाणि मुर्डा पारधी बेडा येथे धाड टाकुन कारवाई करत १६ आरोपीतांवर ८ गुन्हे नोंद करून एकुण २,६२,३५० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.



**पोलीस स्टेशन उमरेड**:— श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी,कन्हान यांच्या मार्गदर्शनात राजुरवाडी आणि दहेगाव पारधीबेडा येथे धाड टाकुन कारवाई दहेगाव येथील १ आरोपीवर १ गुन्हा नोंद करून एकुण ३३,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. राजुरवाडी येथील ४ आरोपीतांवर १ दारूबंदी अधिनियम आणि १११ भान्यासं अन्वये गुन्हा न नोंद करून एकुण १,९७,८०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. एकुण २,३०,८०० /— रूपयांचा मुद्देोमाल जप्त केला.



**पोलीस स्टेशन भिवापुर**:— श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी,कन्हान यांच्या मार्गदर्शनात गरदापार येथे धाड टाकुन कारवाई दहेगाव येथील १ आरोपीवर १ गुन्हा नोंद करून एकुण २३,१०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.




सदर कारवाईत स्थानिक पोलीस स्टेशन, उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, स्थानिक गुन्हे शाखा तसेच दंगा नियत्रंण पथकाचा समावेश होता. वर प्रमाणे एकुण ३१ गुन्हे नोंदविण्यात आले असुन १२,४७,५४० /— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त केला असुन नाशवंत मुद्द्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद आरोपी अटक, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर**:— दिनांक १८/१०/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा कुसुबी ते धापेवाडा रोडवर नाकाबंदी केली असता इको चारचाकी वाहन क्र एम. एच ४० ईए ३५६९ येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. वाहन चालक **आरोपी नामे प्रतीक पुरुषोत्तम ढोले वय २२ वर्ष रा.वार्ड क्र ३ मोहगाव ता.कळमेश्वर याचे ताब्यातुन** १) हुक्का शिशा तंबाखु होला ब्रॅन्ड २) सुगंधित तंबाखु मन ब्रॅड ३) सुगंधित तंबाखु रत्ना ३००० ब्रॅन्ड असा एकुण ९१.९ किलोग्रॅम किंमती १,०९,९१०/— रूपयांचा प्रतिबंधीत अन्नपदार्थ आणि वाहन क्र एम. एच ४० ईए ३५६९ किंमती १,५०,०००/— रूपये असा एकुण २,५९,९१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्रं १ याला अधिक विचारपुस केली असता सदर वाहन मालक आरोपी क्रं **२) नितीन वामन ढोले रा. वार्ड क्र ३ मोहगाव ता. कळमेश्वर हा असुन आरोपी क्रं ३) राकेश गोंविदराव देवगिरकर रा. भागेरथी नगर धापेवाडा ता कळमेश्वर याचे कडुन विकत घेतल्याचे सांगितले.**

नमुद आरोपीतांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे सावनेर येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३, ३(५) सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे

# सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक १९/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन केळवद** अंतर्गत पोलीस निरीक्षक श्री अशिषसिंह ठाकुर, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन केळवद यांनी खैरी, ढालगाव येथे तसेच पोउपनि अरूण राठोड यांनी तिडंगी येथील ग्रामस्थांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

**१. शेअर मार्केट च्या नावाखाली नविन ट्रेडींग फसवणुक सुरू असुन टेड्रींग करीत असाल तर बनावट टेड्रींग अॅप च्या अधिक परताव्याच्या आमिषाला बळी पडु नका.**

**२. टेड्रींग साठी सेबी कडे किंवा आर बी आय कडे नोंदणीकृत प्लॅटफॉर्म निवडा.**

**सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी www.cybercrime.gov.in या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक 1930, 1945 यावर तक्रार नोंदवा.**




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने